MHRG120004622024

<u>नियमित दिवाणी दावा क्र.२२/२०२४</u>

**निसार अहमद उस्मान पंगारकर**

**वि.**

**शब्बीर शकुर महाडिक**

**<u>निशाणी क्र.१९ कडील आदेश</u>**

प्रतिवादी यांनी त्याचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळावी म्हणून प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, त्यांनी वकीलांची नेमणूक केल्यानंतर वेळोवेळी कैफियत व लेखी जबाब दाखल करण्यासाठी मुदत मागितली होती. त्यानंतर रमजानचा महिना चालू झाल्यामुळे व त्यांचा उपवास असल्याने वकीलांना भेटून कैफीयत देणे करीता माहिती देणे मुदतीत शक्य झाले नाही. प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्यास जाणून बुजून टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादीचा बचाव न्यायालयासमोर येण्यासाठी त्याचे विरूध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होणे आवश्यक असल्याने प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची प्रतिवादीने मागणी केली आहे.

२. वादीतर्फे सदर अर्जावर सक्त हरकत असल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे. वादीचा आक्षेप आहे की, प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यासाठी पुरेशी संधी दिलेली आहे. करीता अर्ज फेटाळण्यात यावा.

३. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी हजर झाल्यानंतर त्याने मुदतीत कैफियत दाखल न केल्याने त्याचे विरूध्द दिनांक १०.०४.२०२५ रोजी विना कैफियत आदेश पारित करण्यात आला आहे. प्रतिवादी यांचा रमजानचा उपवास असल्याने त्यांना वकीलांना भेटून कैफीयत देणे करीता माहिती देणे मुदतीत शक्य झाले नाही असे कैफियत दाखल न करता आल्याचे कारण नमूद करण्यात आले आहे. प्रस्तुत अर्जातील विलंबाची कारणे काही प्रमाणात संयुक्तीक दिसत असून दाव्याचा निकाल गुण–अवगुणावर लागण्यासाठी प्रतिवादीला त्याची कैफियत व म्हणणे दाखल करण्याची संधी मिळणे आवश्यक आहे या मतास मी पोहचलो आहे. त्याचवेळी दाव्याच्या सुनावणीस झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादीने वादीला ७००/– रुपये खर्च देणे आवश्यक

आहे. करीता मी खालील आदेश पारित करतो –

**<u>आदेश</u>**

१. अर्ज निशाणी १९ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने वादीस रू.७००/–(रक्कम रु.सातशे मात्र) खर्चाच्या स्वरुपात देण्याच्या अटीवर त्याचे विरुध्द दिनांक १०.०४.२०२५ रोजी पारीत झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात येत आहे.

३. खर्चाची रक्कम भरल्यानंतर प्रतिवादी याने दाखल केलेली कैफियत वाचण्यास परवानगी देण्यात येते.

GHANSHAM RAMLAL TIWARI

Digitally signed by GHANSHAM RAMLAL TIWARI
Date: 2025.07.10 11:03:26 +0530

( घन:शाम रा.तिवारी )

दिनांक : ०९–०७–२०२५

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड